# भारतीय लोकशाही समोरील आव्हान : जमातवाद

**डॉ. ज्योती रमेश कांबळे**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे कॉलेज, कराड.
Email-jyoti9094@gmail.com

**सारांश:** जमातवाद हे भारतीय लोकशाही समोरील मोठे आव्हान आहे. संकुचित धार्मिक अभिमानातून जमातवाद निर्माण दिसून येतो. धर्मांधता हा जमात्वादाचा पाया आहे. धर्मांधतेमुळे व्यापक राष्ट्रीय हिताचा विसर पडतो. परस्पराविषयी त्यांना संशय वाटू लागतो. परधर्मीय देशबांधावाना शत्रू लेखले जाते. संकुचित धार्मिक अभिमानातून जमातवाद निर्माण होतो. धर्मांधतेमुळे व्यापक राष्ट्रहिताचा विसर पडतो. स्वातंत्रोत्तर काळातही देशातील सांस्कृतिक विविधतेला विळखा घालून हा एक ज्वलंत सामाजिक व राजकीय प्रश्न म्हणून अस्तित्वात राहिलेला दिसतो. स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही राजकारणामध्ये जमातवाद हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा झाला. जमात्वादाची चर्चा एकीकडे हिंदू-मुस्लिम दंगली, तर दुसरीकडे इतिहासाचे आकलन, धर्माची चिकित्सा, धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची जडण-घडण इत्यादी मुद्याभोवती प्रामुख्याने राहिलेली दिसते.

**पारिभाषिक शब्द:** लोकशाही, जमातवाद, भारत, धर्म

**प्रस्तावना :**

जमातवाद हे भारतीय लोकशाही समोरील मोठे आव्हान आहे. संकुचित धार्मिक अभिमानातून जमातवाद निर्माण दिसून येतो. धर्मांधता हा जमात्वादाचा पाया आहे. धर्मांधतेमुळे व्यापक राष्ट्रीय हिताचा विसर पडतो. परस्पराविषयी त्यांना संशय वाटू लागतो. परधर्मीय देशबांधावाना शत्रू लेखले जाते. संकुचित धार्मिक अभिमानातून जमातवाद निर्माण होतो. धर्मांधतेमुळे व्यापक राष्ट्रहिताचा विसर पडतो. स्वातंत्रोत्तर काळातही देशातील सांस्कृतिक विविधतेला विळखा घालून हा एक ज्वलंत सामाजिक व राजकीय प्रश्न म्हणून अस्तित्वात राहिलेला दिसतो. स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही राजकारणामध्ये जमातवाद हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा झाला. जमात्वादाची चर्चा एकीकडे हिंदू-मुस्लिम दंगली, तर दुसरीकडे इतिहासाचे आकलन, धर्माची चिकित्सा, धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची जडण-घडण इत्यादी मुद्याभोवती प्रामुख्याने राहिलेली दिसते.

**उदिष्टे :-**

१.जमातवादाची संकल्पना अभ्यासणे.

२. भारतीय लोकशाही समोरील जमातवादाचे आव्हान अभ्यासणे.

३. जमातवादाचे जागतिकरणावर व स्त्रियांवर होणाऱ्या दुष्परिणामांचा अभ्यास करणे.

**जमातवाद :-** Communalism या संकल्पनेला मराठी मध्ये जमातवाद अथवा सांप्रदायिकता" असेही शब्दप्रयोग वापरले जातात. धार्मिक मूलतत्ववाद या अंशानेही जमातवादाचा अभ्यास केला जातो. सर्व सामान्याची रूढीप्रियता, धर्मभोळेपणा याचा आपल्या हितासाठी फायदा घेवून राजकीय किंवा धार्मिक समुदाय दुसऱ्या धार्मिक समुदायाविरुद्ध धर्माच्या आधारवर संघर्ष करण्यास प्रवृत्त होतो तेव्हा जमातवादाचा उदय होतो. यातून धर्माचे राजकारण आकार घेते. थोडक्यात जमातवाद म्हणजे दोन समुदायामध्ये धर्माच्या आधाराने संघर्ष निर्माण होणे.

**भारतीय लोकशाही आणि जमातवाद :-** भारतीय हिंदू आणि मुस्लिम यांच्या वरिष्ठ आणि मध्यम वर्गीय घटकांचे जमातवादीकरण ब्रिटीश राजवटीत अथवा एकोणिसाव्या शतकाच्या उत्तर्धात किंबहुना शेवटच्या दोन दशकात सुरु झाले. ब्रिटीश व पाश्च्यात विचारवंतानी राष्ट्रवादाच्या मुलभूत घटक म्हणून धर्म आणि संस्कृतीची मांडणी केली. भारतातील मुसलमानांचा समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीय अभ्यास असे दर्शवितो की, भारतातील ३५% मुसलमान हे एकेकाळच्या जातीजमातीतील आहेत. मुठभर अशरफ मुस्लिम अपवाद सोडल्यास हिंदू आणि मुसलमान यांत फक्त उपासना पद्धती आणि धार्मिक आचारांचा फरक असून भाषिक, सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या त्यांच्यात प्रचंड सरमिसळ असलेली दिसून येते, परंतु ही सरमिसळ दृष्टीआड करून केवळ धर्म हाच समाजरचना आणि सामाजिक संबंध निश्चित करणारा घटक असतो. असे मानून त्याद्वारे धर्माचे एकसाची रूप उभ करण्यातून जमातवादी विचार प्रणाली रुजविली गेली जात आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये राज्याचा असा कोणताच घर्म असू नये. नागरिकात धर्मावरून भेदभाव होवू नयेत. अल्पसंख्याकाना असुरक्षितपणा जाणवू नये. त्यांना आपला धर्म व संस्कृती सांभाळण्याचे स्वातंत्र्य असणे गरजेचे आहे. अशी भूमिका भारतीय संविधान निर्मात्यांनी घेतलेली दिसून येते. भारतीय राज्यघटनेत स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, संघराज्यीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही, ही मुलभूत तत्वे म्हणून समाविष्ट केली आहेत. जमातवादामुळे धर्मनिरपेक्षता ऐवजी धर्मराष्ट्रांचा पगडा देशात वाढत चालला आहे. धर्मावर नव्हे तर आर्थिक समतेवर आधारित समाजवादाच्या संकल्पनेऐवजी कमालीच्या विषमतावादी भांडवलशाहीचा पुरस्कार केला जात आहे.

**जागतिकीकरण आणि जमातवाद :-** जागतिकीकरणाचे सांकृतिक परिणाम म्हणून अनेक प्रकरणी धर्मनिरपेक्ष लोकशाही संकृतीला हादरे बसत आहेत. राष्ट्रातील भांडवलाचे संकृती उद्योगात हितसंबंध गुंतलेले असल्यामुळे विविध मार्गाचा वापर करून त्याने त्यात शिरकाव केला आहे. संस्कृतीचे जमातवादी स्वरुपात सवंग सादरीकरण हा त्याचाच एक महत्वाचा परिणाम दिसतो. जागतिक भांडवलशाहीपुढे उभा असलेला पेच सोडविण्यासाठी १९७० नंतर जागतिक नाणेनिधी व जागतिक बँकेमार्फत भांडवलशाहीची पुनर्रचना करण्यास सुरुवात झाली. ८० च्या दशकात याला रिजनवाद व थेचरीझम म्हणून संबोधले जावू लागले. या विचारप्रणालीमार्फत नव-उदारमतवादी बाजारपेठेची भलावण सुरु झाली. शर्मिला रेगे यांच्या मते, खुल्या बाजारपेठेचा गौरव करणारे, त्यांची सक्ती करणारे अर्थकारण, नव-सांस्कृतिक राष्ट्रवाद मांडणारे, राजकारण व धर्मांध व प्रतिगामी मुल्यांची भलावण करणारे राजकारण या जागतिकीकरणाच्या गाभ्याशी होते. म्हणजेच खुल्या बाजारपेठांची दुसरी बाजू म्हणजे जमातवाद / धार्मिक मूलतत्ववाद हे स्पष्टपणे पुढे येते. भारतामध्ये १९९० नंतर हिंदू राष्ट्राची कल्पना व परकीय भांडवल हे हातात हात घालून आले. ९० च्या दशकात खुल्या अर्थकारणाचे धोरण स्वीकारल्यानंतर एका बाजूला साम्राज्यवादी शक्तीशी हातमिळवणी सुरु झाली, तर दुसऱ्या बाजूला राजकीय हितसंबंध जोपासण्यासाठी खुलेपणाने जमातवादाचा वापर सुरु झाला.

**जमातवाद आणि स्त्रिया :-** काही स्त्रीवादी अभ्यासकांच्या मते जमातवाद आणि लिंगभावातील संबंध देखील गुंतागुंतीचा आहे. जमातवादी राजकारणामध्ये स्त्रिया संबंधीचा मुद्दा नेहमीच समूहाच्या अस्मितेचा मुद्दा बनविला जातो. म्हणजेच अनेकदा जमातवादी राजकारण आपल्या किंवा दुसऱ्या समूहाच्या स्त्रियांना वापरून केला जातो. उदाहरणार्थ अलीकडेच घडून आलेली उत्तर प्रदेशातील मुजफ्फरनगर शहरांमधली दोन धर्मातील समूहातील दंगल इत्यादी दंगलीमध्ये स्त्रीची छेडछाड हा मुद्दा कळीचा ठरला आहे. हिंसेचे समर्थन करणारा ठरला आहे, धार्मिक संघटन करण्यासाठी ही स्त्रियांचा वापर केला जातो. एक जिन्सी समूहाची कल्पना दंगलीमध्ये वापरली जाते. दुसऱ्या समूहाला शत्रू ठरविण्यासाठी जमातवादी अस्मिता जागृत केल्या जातात, यासाठी स्त्रियांचा वापर इतिहास आतून बाजूला करून मिथके, प्रतीके म्हणून वापर केला जातो. सण, उत्सवाचा वापर, प्रसारमाध्यमे, रामायण, महाभारत यासारख्या टीव्ही मालिका यांचा वापर करून स्त्रियांचे विचार वळविले जातात. भारत व पाकिस्तान फाळणीतून हे दिसून येते की, स्त्रियांना समूहाचे राष्ट्राचे प्रतीके बनविले जातात, ही प्रतीके पुरुषप्रधान मूल्यवस्थेतून आलेली असतात.

जमातवादी दंगलीकडे स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून पाहताना जात, वर्ग, लिंगभाव व समुदाय यांच्यातील गुंतागुंतीच्या संबंधाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. बाबरी मशिदीनंतरच्या किंवा गोधरानंतरच्या दंगलीतील स्त्रियांचा वाढता सहभाग पाहता, या परिघटनेचे विश्लेषण करण्याची गरज स्त्रीवादी अभ्यासकांना वाटू लागली आहे जमात वाद आणि स्त्रिया यांचा संबंध केवळ स्त्रिया जमात वादाच्या बळी असतात या पलीकडे जाऊन तपासण्याची गरज वाटू लागली स्व समूहातील स्त्रियांच्या लैंगिक पावित्र्याच्या संरक्षणाचा मुद्दा जमातवादी दंगलीमध्ये महत्त्वाचा बनतो जमातवादी दंगलीमध्ये बलात्काराचा वापर शस्त्रासारखा केला जातो. स्त्रियांच्या शरीरावर सत्ता गाजवून तिच्या समूहाला हरविण्यासाठी साधन म्हणून त्याचा वापर होतो. जमातवादी दंगलीमध्ये सामूहिक बलात्कार मोठ्या संख्येने होतात.

**सारांश :-** जमातवादाचा प्रश्न हा भारताच्या लोकशाही धर्मनिरपेक्षतेपुढील खूप मोठे आव्हान आहे, त्याचे व्यक्तिगत, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, तसेच मानसिक अशा सर्व पातळ्यांवर परिणाम होत असताना दिसून येतात. त्याचबरोबर जमातवादाचा पुरुषसत्तेशी व जागतिक भांडवलशाहीशी असलेला अनन्य साधारण संबंध लक्षात घेता, या प्रश्नाची व्याप्ती व गुंतागुंत समजून घेता येऊ शकते. व्यापक पद्धतीने केलेले जमातवादाचे समाजशास्त्रीय आकलनच जमातवाद या प्रश्नाच्या सोडवणुकीची योग्य दिशा दाखवू शकते.

**संदर्भ :-**

१. चव्हाण दिलीप, समकालीन भारत : जाती अंताची दिशा, पुणे, 2019.
२. देहडराय स्वाती, लिंगभेदाचे राजकारण आणि जमात वादाचे आकलन पुणे, 2006.
३. पळशीकर सुहास, जमातवाद धर्म धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही, पुणे, 2006.
४. पानसरे मेघा, (संपादित) धर्मनिरपेक्ष लोकशाही आणि जमातवाद, कोल्हापूर, 2018.
५. भोळे भास्कर, धर्मनिरपेक्ष लोकशाही पुढील जमातवादाचे आव्हान, सातारा, 2002.